पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय
क्रमांक – नस/४/कावि/ ८५६ /२०१३
दिनांक - १३/०९/२०१३

प्रति,

मा.....................................
सदस्य, शहर सुधारणा समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

विषय – पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची सभा दिनांक १९/०९/२०१३ रोजी आयोजित केलेबाबत.

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा गुरुवार दिनांक १९/०९/२०१३ रोजी दुपारी ३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत -

१) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – १८.
मा.शहर सुधारणा समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – ८**

दिनांक :- १९/०९/२०१३ वेळ - दुपारी ३.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा गुरुवार दिनांक १९/०९/२०१३ रोजी दुपारी ३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

**विषय क्र.१)** मोरवाडी स.नं.१५०, १५१, १५२ येथे आरक्षण क्र.९१ मधील पार्क या आरक्षणातील पश्चिमेकडील २०५००.०० चौ.मी.क्षेत्र आणि आरक्षण क्र.९५ सांस्कृतिक केंद्र २००० मी. असे एकूण सुमारे २२५००.०० चौ.मी.क्षेत्र या आरक्षणातून वगळून प्रस्तावा सोबतच्या नकाशात दर्शविल्याप्रमाणे आरक्षण क्र.९५ बहुद्देशिय कलाकेंद्र या प्रयोजनासाठी आरक्षित करणेकरिता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये पुर्नफेरबदल बाबत कार्यवाही प्रसिध्दीस देऊन त्यावरील प्राप्त हरकती, सुचना यावर सुनावणी घेऊन शासनास फेरबदल प्रस्ताव सादर करणेबाबत आयुक्तांना अधिकार देणेबाबत मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**विषय क्र.२)** पिंपरी चिंचवड मनपा हद्दीत चाकण, देहू, आळंदी, हिंजवडी, म्हाळुंगे, मोई,मारुंजी व इतर परिसराचा समावेश करणेबाबत शासनास मनपाचे अभिप्राय सादर करणेपूर्वी सर्व पदाधिकारी यांची बैठक दि.३०/०८/२०१३ रोजी मा.आयुक्त यांचे कक्षात घेण्यात आली. सदर बैठकीत मनपा हद्दीच्या उत्तरेकडील १४ गावे आणि मनपा हद्दीच्या पश्चिमेकडील ६ गावे मनपा हद्दीत समावेश करणेबाबत सविस्तर चर्चा करणेत आली आणि सदर हद्दवाढीचा प्रस्ताव मा.शहर सुधारणा समिती मार्फत मा.महापालिका सभेपुढे सादर करणेबाबत चर्चा झाली तथापि सद्यस्थितीत मनपा हद्दीला लागून असलेली गावे मनपा हद्दीत समाविष्ट करणे योग्य होईल. त्यानुसार खालील नमुद मनपा हद्दीच्या उत्तरेकडील आळंदी,

चिंबळी, कुरुळी, मोई, निघोजे, देहू, विठ्ठलनगर आणि मनपा हद्दीच्या पश्चिमेकडील गहुंजे, जांबे, मारुंजी, हिंजवडी, माण, नेरे, सांगवडे ही मनपा हद्दीला लागून असलेली एकूण १४ गावे मनपा हद्दीत समाविष्ट करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय,
क्रमांक - नस/४/कावि/ ८५६ /२०१३
दिनांक - १३/०९/२०१३.

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेट्स) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.

\\Nagersachiv4\nnn\Nagersachiv1/shsu-१३-१४\agenda8doc.